कोर्ट विद्यमान श्री. प्रताप वाघमारे , तहसीलदार हिंगणा यांचे कार्यालय

राआक्र-२५/ एन.ए.पी- ३४ / २०१८-१९
मौजा- वानाडोंगरी ,पहन – ४६

विषय :- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२ ड अन्वये निवासी अकृषक सारा स्वीकारण्याबाबत व अकृषक वापर परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- १) अर्जदार देवीकर लॅन्ड डेवलपर्स तर्फे भागीदार श्री. पंडित शंकरराव देवीकर रा. नागपूर यांचा अर्ज दिनांक – २३ / ०१ /२०१९
२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दिनांक ५ जानेवारी २०१७

आदेश दिनांक
(२५/ ०१ / २०१९)

अर्जदार देवीकर लॅन्ड डेवलपर्स तर्फे भागीदार श्री. पंडित शंकरराव देवीकर रा. नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये मौजा वानाडोंगरी तहसील हिंगणा , जिल्हा नागपूर पहन-४६ येथील त्यांच्या भोगवट्यातील शेत स.न.१४०, १६५/१, १६५/३ आराजी ०.५८, ०.८२, १.४० एकूण आराजी २.८० पैकी २.८० हेआर (२८००० चौ. मी.) च्या कृषक जमिनीच्या निवासी प्रयोजनार्थ अकृषक सारा शासन खजिन्यात जमा करण्याकरीता व अंतिम विकास आराखड्याप्रमाणे अकृषक वापर परवानगी करीता या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२ व ४२ अ मध्ये सुधारणा करून शासनाने ५ जानेवारी २०१७ अधिसूचना द्वारे कलम ४२ व व ४२ ड अंतर्भूत करून अंतिम विकास योजनेमध्ये दर्शविलेल्या वापर विभागानुसार त्याअंतर्गत जमिनीच्या अकृषिक वापराकरिता मानीव रुपांतर बाबतची तरतूद करण्यात आली आहे. व पोटकलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे रुपांतर कर, अकृषक आकारणी आणि लागू असेल तेथे नजराणा किंवा अधिमुल्य, किंवा इतर शासकीय देणी यांचा भरणा केला असेल तर अश्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमिनीचा वापर हा , अश्या विकास योजनेतील वाटप, आरक्षण किंवा निर्देशन या स्वरूपात दर्शविलेल्या वापरात रुपांतरीत करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि अशा विकास योजनेनुसार अनुज्ञेय असलेल्या वापराकरिता कलम ४२ किंवा कलम ४४ अन्वये इतर कोणताही स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

अर्जदार यांच्यातर्फे खालील अटीच्या आधारे निवासी अकृषक सारा शासन खजिन्यात जमा करण्यात येईल.

१) अर्जदार यांनी नियोजन प्राधिकरण यांचेकडून अभिन्यास मंजूर करून घेणे बंधनकारक राहील..
२) बांधकाम करण्यापूर्वी संबधित नियोजन प्राधिकरण यांचेकडून परवानगी घ्यावी लागेल.
३) प्रस्तावित ठिकाणी किमान १२.०० मी. रुंद पोच रस्ता आवश्यक राहील.

४) अर्जदार यानी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून अभिन्यास मंजूर केल्याशिवाय कुठल्याही प्रकारे जमिनीची / भूखंडाची करारनामा, विक्री करता येणार नाही.

५) नकाशा मंजुरीपश्चात मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सनद प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

६) अर्जदार यांनी मौक्यावर बांधकाम सुरु करण्यापूर्वी तहसील कार्यालय येथे लेखी कळवावे व त्यानंतरच बांधकाम सुरु करावे. तसेच मंजूर अभिन्यासची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

उपरोक्त प्रमाणे जागेचे एकूण क्षेत्रफळ २८००० चौ.मी. पैकी अकृषक सारा आकारणी करावयाचे क्षेत्र म्हणजेच २८००० चौ.मी. यास .०.१० पैसे प्रती चौ.मी. याप्रमाणे अकृषक महसूल कर रु. २८०० /- , ग्रामपंचायत सेस कर अकृषक कराएवढा रु निरंक , जिल्हापरिषद सेस सारा ७ पट अकृषक कराच्या रु निरंक /- , परावर्तीत कर अकृषक सा-याच्या ५ पट म्हणजेच रु १४०००/- असे एकूण रु १६८०० /- चालान क्र. ११०५६०९७ दिनांक – २४ / १ /२०१९ अन्वये शासन खजिना जमा करण्यात आलेले असून अर्जदार यांना अटी व शर्तीच्या आधारे निवासी अकृषक आकारणी शासन जमा करण्याचा आदेश देण्यात येत आहे.

(प्रताप वाघमारे)
तहसीलदार, हिंगणा

प्रतिलिपी :-

१) मा. जिल्हाधिकारी , नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

२) मा.उपविभागीय अधिकारी , नागपूर (ग्रा) यांना माहितीस सविनय सादर.

३) मा.उपसंचालक , नगर रचना , नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण , नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस .

४) तलाठी सा. क्र. ४६ मौजा. वानाडोंगरी यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

५) दुय्यम निबंधक, तहसील हिंगणा यानी उपरोक्त आदेशान्वये जमिनीचा / भूखंडाचा नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण , नागपूर यांचेकडून अभिन्यास मंजूर असल्याशिवाय जमीन / भूखंड यांचा करारनामा , विक्री होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

६) अर्जदार देवीकर लॅन्ड डेवलपर्स तर्फे भागीदार श्री. पंडित शंकरराव देवीकर रा. नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

(प्रताप वाघमारे)
तहसीलदार, हिंगणा

कोर्ट विद्यमान श्री. संतोष खांडरे तहसीलदार हिंगणा यांचे कार्यालय,

रामाक- 24 /एन.ए.पी- ३४/२०१८-१९
मौजा- वानाडोंगरी, पहन – ४६

वाचा :– या कार्यालयाचे रामाक २४ /एन.ए.पी–३४/२०१८–२०१९ आदेश पारित दि. २५/०१/२०१९

संदर्भ :- अर्जदार देविकर लॅन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. पंडित शंकरराव देविकर रा. नागपूर यांचा अर्ज दिनांक ०६/ ०८/२०१९

शुध्दीपत्र /सुधारीत आदेश

(पारित दिनांक १३/०८/२०१९)

ज्याअर्थी या कार्यालयाचे आदेश क्र. रामाक २४ /एन.ए.पी–३४/२०१८–२०१९ आदेश पारित दि. २५/०१/२०१९ अर्जदार देविकर लॅन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. पंडित शंकरराव देविकर रा. नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये मौजा वानाडोंगरी तहसील हिंगणा, जिल्हा नागपूर पहन- ४६ येथील त्यांच्या भोगवट्यातील शेत स.न. १४०, १६५/१, १६५/३ आराजी ०.५८, ०.८२ १.४२ एकुण आराजी २.८० हे आर. (२८००० चौ.मी.) च्या कृषक जमिनीच्या निवासी प्रयोजनार्थ अकृषक आदेशातील अंशता दुरूस्ती करण्याकरिता अर्ज सादर केलेला आहे.

सदरहु प्रकरणात खालील प्रमाणे अटी व शर्ती मध्ये शुध्दीपत्र करण्यात येत आहे.

४) अर्जदार यांनी नागपूर "महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" यांचेकडुन अभिन्यास मंजुर केल्याशिवाय कुठल्याही प्रकारे जमिनीची /भुखंडाची करारनामा, विकी करता येणार नाही.

५) नकाशा मंजूरी पाश्चात भा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सनद प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

त्या ऐवजी

४) अट क ४ मधील "महानगर प्रदेश विकास प्राधिकरण" "ऐवजी" मुख्याधिकारी नगर परिषद, वानाडोंगरी यांचेकडून परवानगी घेण्यात यावी.

५) . नकाशा मंजुरी पाश्चात तहसिल कार्यालयाकडून सनद प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील

(संतोष खांडरे)
तहसीलदार, हिंगणा

प्रतिलिपी :-

१) मंडळ अधिकारी, हिंगणा यांना माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
२) तलाठी सा.क ४६ मौजा वानाडोंगरी यांना माहितीस तथा आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
३) अर्जदार देविकर लॅन्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. पंडित शंकरराव देविकर रा. नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

(संतोष खांडरे)
तहसीलदार, हिंगणा